REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख १३ डिसेंबर, १९४४ | अंक ४९




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

" Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

**दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.**

स्थापना : १९३५
हेड ऑफिस : पुणें शहर

**विक्रीस काढलेलें नवीन भांडवल**
**रु. १०,००,०००**
( प्रत्येकीं रु. ५० च्या २०,००० भागांत विभागलेलें )

वरील शेअर्स ता. ४-१०-४४ रोजीं बँकेच्या रजिस्टरवर असलेल्या शेअर-होल्डरांना त्यांच्या प्रत्येक जुन्या १ शेअरला १ नवीन शेअर असे रु. ५ वाढीनें देऊं केले आहेत. पहिल्या शेअर-होल्डरांनी घेऊन उरलेले शेअर्स इतरांस तेवढ्याच वाढीनें (रु. ५) देण्यांत येतील. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १५-१२-४४ ही आहे.

—डायरेक्टर बोर्ड—
श्री. धों. कृ. साठे, चेअरमन
श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. गानडे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एम. जी. मराठे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.
विशेष माहितीसाठी लिहा.
सी. व्ही. जोग, मॅनेजर

**देना बँक**
देवकरण नानजी बँकींग कं. लिमिटेड.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल... ... ... | ...रु. १,००,००,००० |
| वर्गीकृत व खपलेलें भांडवल | ...रु. ५०,००,००० |
| रिझर्व्ह फंड... ... ... ... | ...रु. ११,००,००० |
| एकुण ठेवी ... ...३०-११-४४ | ...रु. ७,२१,४७,६५१ |
| एकुण वर्किंग फंड... ,, | ...रु. ८,१८,५७,३८१ |
| खात्यांची संख्या... ,, ... | ३९,०४१ |
| शाखांची संख्या... ... | ३३ |

देना बँकेच्या सर्व कचेऱ्यांत, हिंदुस्थान सरकारचे १० रुपये व १०० रुपये किंमतीचे प्राइझ बाँड्सहि विकत मिळतात.

**सांडू टोमॅटो कम्पाउन्ड**

ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.

द. कृ. सांडू ब्रदर्स. चेंबूर, लिमिटेड.
मुंबई

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ, मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच टाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

## विविध माहिती

### अमेरिकन उत्पादनांत प्रचंड वाढ

१९३९ सालीं अमेरिकेनें ४,६२,१०० टनांच्या वहातुकीच्या आगबोटी तयार केल्या, १९४३ मध्यें त्यांचें उत्पादन १,९७,८४,३०० टनांचें झालें. मॅग्निशियमचें उत्पादन ६७ लक्ष पौंडांवरून ३९ कोटि पौंडांवर गेलें. कृत्रिम रबराच्या उत्पादनाचा आकडा २½ हजार टन होता तो ९ लक्ष टन झाला आहे.

### नादुरुस्त इंजनांचें प्रमाण-तुलनात्मक आकडे

हिंदुस्थानांतील उतारूंच्या आगगाड्यांच्या डब्यांत युद्धापूर्वी जेवढीं माणसें बसून प्रवास करीत असत, त्यांच्यापेक्षा ३२% अधिक माणसें आतां प्रवास करतात. मालगाडींत ८½% अधिक माल मावतो. आजारी इंजनांचें प्रमाण पाहिलें असतां इंग्लंडमध्यें किरकोळ नादुरुस्तीसाठी विश्रांति घेणारीं एकूण इंजनांच्या १४·३४% इंजनें आहेत तर हिंदुस्थानांत त्यांचें प्रमाण १५·९१% पडतें. मोठ्या दुरुस्तींत असलेल्या इंजनांचें प्रमाण इंग्लंडमध्यें ५·६६%, अमेरिकेंत ५·२% व हिंदुस्थानांत ५·५% आहे. इंजनांची तंदुरुस्ती हिंदुस्थानांत चांगल्या तऱ्हेनें राखण्यांत येते, असा निष्कर्ष वरील तुलनात्मक आकड्यांवरून काढण्यांत येत आहे.

### ब्रिटिश आगबोटींची खरेदी

ब्रिटिश आगबोटींची खरेदी करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी इंग्लंडमध्यें गेले आहेत. अशा आगबोटी पुढें हिंदुस्थानांत बांधतां याव्या, ह्या दृष्टीनेंहि बोलणीं होतील. आपल्या आगबोटी देऊन हिंदुस्थानचें देणें कांहीं अंशीं फेडण्यास इंग्लंडला ही संधी चांगली आहे.

### भुइमुगाची पेंड

भुइमुगाच्या पेंडीचा मुंबई सरकारनें नियंत्रित केलेला भाव टनास ६० रुपये आहे. बिन गळक्या, बिन ठिगळांच्या, बिन रफूच्या भक्कम पोत्यांचाहि त्या किंमतींत समावेश होतो.

### म्हैसूर शुगर कं. लि.

वरील कंपनीनें ३० जून, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी २,९४,५८७ टन ऊंस गाळला व २०,२१० टन साखर तयार केली. कंपनीला ढोक व निव्वळ नफा अनुक्रमें १८ लक्ष रु. व ७½ लक्ष रुपये झाला. व भागीदारांस २०% डिव्हिडंड मिळालें. कंपनीचें वसूल भांडवल २१ लक्ष रुपये असून तिचा रिझर्व्ह फंड ४२ लक्ष रुपये आहे. डिव्हिडंडचा दर न वाढवितां, कंपनीचा पाया भक्कम करण्याचें धोरण डायरेक्टरांनीं स्वीकारलें आहे.

### असेंब्लीची येती बैठक

मध्यवर्ती असेंब्लीच्या अंदाजपत्रकाच्या बैठकीस ता. ८ फेब्रुवारी रोजीं प्रारंभ होऊन ती ५ एप्रिलपर्यंत तरी चालेल. ता. १५ फेब्रुवारी रोजीं रेल्वे बजेट व २८ फेब्रुवारी रोजीं मध्यवर्ती बजेट असेंब्लीस सादर करण्यांत येईल. बिनसरकारी ठरावांस तीन व बिनसरकारी बिलांस दोन दिवस मिळतील.

### कलकत्ता शहरांत मलेरियाचें ठाणें

कलकत्ता शहरास मलेरियानें चांगलेंच ग्रासलें आहे. तेथील किमान एक लक्ष लोक तरी त्या रोगानें पछाडलेले आहेत. दुष्काळामुळें लोकांची रोगप्रतिकारक शक्ति नाहींशी झालेली आहे आणि त्यांतच कलकत्त्याच्या सदोष ड्रेनेज पद्धतीची भर पडली आहे. विशेषतः पूर्वभागास त्याचा फारच उपद्रव होतो.

### कोळशाच्या खाणींची खरेदी

सिंगाराणी येथील कोळशाच्या खाणींच्या मालकी हक्काची खरेदी, शेअर्सची किंमत बाजारभावानें हिशोबांत घेऊन १ कोटि १० लक्ष रुपये देऊन निजाम सरकारनें केली. सिंगाराणी कोलायरीज कं. लि. चे शेअर्स व डिबेंचर्स हैद्राबाद डेक्कन कंपनी लि. धारण करीत होती, त्याबद्दल व कोळसा आणि इतर खनिज पदार्थ ह्यांचें उत्पादन करण्याच्या खंडाबद्दल मिळून ही रक्कम दिली गेली. सिंगाराणी कोलायरीज लि.कडे खंडानें असलेल्या क्षेत्रांत एक अब्ज टन कोळसा असावा असें तज्ज्ञांचें म्हणणें आहे. १८८३ सालीं ह्या कंपनीनें कोळसा काढण्यास प्रारंभ केला व आतांपर्यंत फक्त ३⅓ कोटि टन कोळसा खणून काढण्यांत आला आहे.

### शेड्यूल्ड बँकांत वाढ

रिझर्व्ह बँकेच्या दुसऱ्या शेड्यूलमध्यें ५ बँकांची भर पडली असून शेड्यूल्ड बँकांची संख्या ७९ वरून ८४ वर गेली आहे.

### "दि टाइम्स" चा ५०,००० वा अंक

'दि टाइम्स' ह्या ब्रिटिश वृत्तपत्राचा ५०,००० वा अंक २५ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध झाला त्यानिमित्त त्यास इंग्लंडचे राजेसाहेब व मुख्य प्रधान ह्या दोघांनीं संदेश पाठविले होते.

### आगगाडीच्या पायरीवरून प्रवास

जी. आय. पी. रेल्वेच्या आगगाड्यांच्या पायरीवर उभें राहून प्रवास केल्याबद्दल मुंबईमधील कोर्टांत ऑक्टोबर महिन्यांत १६३ लोकांना शिक्षा झाली.

### हिंदी कागदाचें उत्पादन

हिंदी गिरण्यांतील कागदाचें उत्पादन थोडें सुधारलें असल्याकारणानें, लोकांना वापरावयासाठीं पूर्वीपेक्षां ज्यास्त कागद उपलब्ध करून देणें शक्य होत आहे, असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे.

### सर विश्वेश्वरअय्या 'डॉक्टर' झाले

पाटणा विश्वविद्यालयानें सर एम. विश्वेश्वरअय्या ह्यांस डी. एससी. पदवी अर्पण केली आहे.

### "ब्रिटिश साम्राज्य पैसे लुबाडणारी टोळी नव्हे."

"ब्रिटिश साम्राज्य ही एक बळजबरीनें पैसे लुबाडणारी व ज्या पैशावर ग्रेटब्रिटनचा नैतिक अधिकार नाहीं असा पैसा ब्रिटनमध्यें आणणारी एक प्रचंड संघटना आहे, अशी भाषा कधींकधीं अमेरिकेंत ऐकूं येते. वस्तुतः साम्राज्यांतील कोणत्याहि भागांतून ब्रिटिश सरकारास एका पैचीहि प्राप्ति होत नाहीं, हें सत्य आहे." वरील उद्‌गार अमेरिकेंतील ब्रिटिश वकील लॉर्ड हॅलिफॅक्स ह्यांनीं शिकॅगो येथील आपल्या भाषणांत काढले. अमेरिकेच्या उसनवार मदतीमुळें, निर्गत व्यापाराची काळजी न करतां ग्रेटब्रिटन युद्धाकडे संपूर्णपणें लक्ष पुरवूं शकला; युद्ध संपतांच तात्काळ निर्गत व्यापार सुरू होण्यावरच ग्रेट ब्रिटन पुनः पूर्ववत् होणें अवलंबून आहे, असेंहि ते म्हणाले.

हालचालयुक्त व चित्ताकर्षक
**चित्रकला प्रदर्शन**
आर्यन सिनेमाजवळ, पुणें शहर
वेळः—३॥ ते रात्रौ १० वाजेपर्यंत

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४०६ | गुळाची नियंत्रित किंमत | |
| २ ठेवीदारांच्या हितासाठी बँकांवर कडक देखरेख | ४०७ | ५ रत्नाकर बँक लि. ... | ४१० |
| ३ फ्रान्समधील चलन-व्यवस्था ... ... | ४०८ | ६ व्यापारी शिक्षणाचें राष्ट्रीय महत्त्व ... | ४११ |
| ४ स्फुट विचार... ... | ४०९ | ७ वैयक्तिक रेशनकार्डांस प्रारंभ ... ... | ४११ |
| वैमानिक वहातुक परिषदेची हकिगत—हिंदी आरमार आणि जहाजांचा धंदा-धान्य गोळा करण्याची व्यवस्था- | | ८ पेनिसिलिन ... ... | ४१२ |
| | | ९ गव्हाच्या पिकाचा अंदाज ... ... | ४१२ |



# अर्थ

बुधवार, ता. १३ डिसेंबर, १९४४


## ठेवीदारांच्या हितासाठी बँकांवर कडक देखरेख

### नव्या कायद्याचीं बंधनें

बँकांच्या नियंत्रणासाठी करण्यांत येत असलेल्या स्वतंत्र कायद्यामधील तपशीलवार कलमें पाहिलीं असतां, प्रस्तुत कायदा किती व्यापक स्वरूपाचा आहे ह्याची कल्पना येते. ठेवीदारांच्या हितास जपणें, हें त्या कायद्याचें मुख्य उद्दिष्ट आहे. शेड्यूल्ड बँकांनीं रिझर्व्ह बँकेंत आपल्या रोजच्या ठेवींच्या विशिष्ट प्रमाणांत किमान रकम राखली पाहिजे, असें रिझर्व्ह बँक कायदा सांगतो, व ही रकम न ठेवणाऱ्या बँकांस दंडहि ठेवलेला आहे. तथापि, दंडादाखल भारी व्याज देऊन, शेड्यूल्ड बँकांस आपलें रिझर्व्ह बँकेकडील डिपॉझिट जरूरीप्रमाणें काढून घेतां येतें व डिपॉझिटचा मूळ उद्देश सफळ होत नाहीं. ठेवीदारांच्या पैशांपैकीं अगदीं थोड्या भागाची ही गोष्ट झाली. उरलेल्या रकमा शेड्यूल्ड बँकांनीं कशा व कोठें गुंतवाव्या, ह्यावर तर मुळींच बंधन नाहीं. कंपनी कायद्यानें बँकांचें किमान भांडवल, नफ्याच्या किमान हिश्याचा रिझर्व्ह फंडाकडे विनियोग, ठेवींच्या कांहीं किमान प्रमाणांत रोख रकम राखणें, इत्यादि बाबतींत बँकांवर बंधनें घातलेलीं आहेत व तीं मुख्यतः बिगर-शेड्यूल्ड बँकांसच लागू पडतात, कारण शेड्यूल्ड बँकांच्या संबंधीं नियम रिझर्व्ह बँक कायद्यांत वेगळे दिलेले आहेत. तथापि, हीं सर्व बंधनें ठेवीदारांच्या हितसंरक्षणास पुरेशीं नाहींत, असें आतां आढळून आलें आहे आणि सरकारनें नव्या कायद्यांत कडक उपाययोजना केली आहे.

### सरकारी नियंत्रण कशासाठी ?

बँकिंगसारख्या धंद्याच्या तपशिलांत सरकारनें किती हात घालावा, ह्यास कांहीं मर्यादा असूं नये काय ? असा विचार प्रस्तुत समयीं मनांत येणें स्वाभाविक आहे. कायद्याचीं बंधनें अगदीं जरूरीपुरतींच असावीं व बँकांनीं आपल्या विशिष्ट परिस्थितीप्रमाणें स्वतःवर आपण होऊन बंधनें घालून घ्यावीं ही गोष्ट सर्वांत उत्तम. इंग्लंड, फ्रान्स, इत्यादि देशांत बँकांवर कायदेशीर बंधनें फारच थोडीं आहेत. तेथील बँकांनीं मध्यवर्ती बँकेंत किती रकम ठेवावी हें सर्वस्वी त्यांचेवरच सोपविलेलें आहे. तेथील बँकिंगची प्रगति स्पृहणीय नाहीं असें कोण म्हणेल ? असें असतांना, हिंदी बँकांवरच सरकारी नियंत्रणें इतकीं कां असावीं ? ह्याचें उत्तर, गेल्या कांहीं वर्षांतील बँकिंगच्या धंद्यास मिळत चाललेल्या अनिष्ट वळणामध्यें आढळून येईल. मोठ्या, नामवंत व जुन्या बँकांशीं स्पर्धा करून नव्या बँकांना पुढें यावयाचें असल्याकारणानें, त्यांस आपल्या प्रतिस्पर्ध्यांपेक्षा खालच्या पातळीवर येऊन व्यवहार करण्याचा मोह उत्पन्न होतो आणि एकदा रूढी व मजबुती ह्यांचा पाया सुटला म्हणजे तोल संभाळणें कठीण जातें. अशा बँकांच्या व्यवहाराचें प्रभावी नियंत्रण सरकारी कायद्यानेंच केल्याखेरीज भागणार नाहीं, हें उघड आहे.

### इष्ट गोष्ट आतां अपरिहार्य झाली

रिझर्व्ह बँकेनें १९३९ सालींच ह्यासंबंधांत आपलें म्हणणें हिंदुस्थान सरकारास कळवून व इष्ट योजनेच्या बिलाचा मसुदा तयार करून, पाठविला होता. नवीन बँकिंग कंपनीज ॲक्ट ह्याच सूचनांवर आधारण्यांत येणार असला तरी त्यांतील कलमांनीं बँकांस मूळ कल्पनेपेक्षा पुष्कळच घट्ट बांधून टाकलेलें आहे, असें दिसून येईल. बँकांनीं ठेवावयाचीं कर्जें, रोख बाळगावयाच्या रकमा, रिझर्व्ह बँकेस सादर करावयाचे हिशेबाचे तक्ते, बँकांची तपासणी, बँकांवर इलाज करण्याचे सरकारचे अधिकार, इत्यादींसंबंधीं सरकारनें घातलेल्या बंधनांची माहिती खालीं दिली आहे, तीवरून सरकार बँकांच्या दैनंदिन व्यवहारावर कसें नियंत्रण ठेवूं पहात आहे, हें लक्षांत येईल. १९३९ सालीं जी गोष्ट इष्ट वाटली, ती आतां अपरिहार्य झाली आहे. आग लागल्यावर ती विझविण्याच्या प्रयत्नास लागण्यापेक्षा, तिचा प्रतिबंध करणें हेंच योग्य, ह्या न्यायानें बँकिंगविषयक कायद्यास उशीर झाला असला तरी ह्यापुढें मात्र दिरंगाई न करण्याचें सरकारचें धोरण निश्चित दिसतें.

### कर्जांवर निर्बंध

बँकिंग कंपन्यांनें आपल्या स्वतःच्या न वसूल केलेल्या भाग भांडवलावर बोजा निर्माण करतां कामा नये. असा बोजा बेकायदा ठरेल. आपल्या स्वतःच्या शेअर्सचे तारणावर कर्ज देण्यास बँकांना बंदी करण्यांत आलेली आहे. त्याचप्रमाणें, आपल्या डायरेक्टरांस किंवा ज्या फर्म्स व कंपन्या ह्यांत आपल्या डायरेक्टरांचा किंवा बँकेचा स्वतःचा भागीदार, डायरेक्टर, मॅनेजिंग एजंट, ह्या नात्याचा संबंध आहे अशांना बिगर-तारण कर्जें देण्याचीहि बँकांना बंदी केलेली आहे.

### रोख रकम व ब्रि. हिंदुस्थानांत गुंतवणूक

कायद्यास प्रारंभ झाल्यानंतर दोन वर्षांपासून प्रत्येक बँकेनें ब्रिटिश हिंदुस्थानांतील आपल्या रोजच्या एकूण देण्याच्या २५% इतकी रकम रोख, सोनें, मान्य केलेले व इतर ठिकाणीं तारण न दिलेले रोखे ( ज्यांची बाजार भावानें होणाऱ्या किंमतीपेक्षा ज्यास्त किंमत हिशेबांत धरतां कामा नये ) ह्यांच्या स्वरूपांत राखली पाहिजे. देण्याचा आकडा ठरवितांना वसूल भांडवल, रिझर्व्ह, नफा-तोटा खात्यांतील शिल्लकी नफा, रिझर्व्ह बँकेकडून घेतलेलें कर्ज, हीं विचारांत घेण्याचें प्रयोजन नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थान व ग्रेट ब्रिटन ह्यांचे बाहेर स्थापन झालेल्या बँकेनें ११

(२) ह्या कलमाप्रमाणें रिझर्व्ह बँकेकडे ठेवलेलें डिपॉझिट किंवा रिझर्व्ह बँक कायद्याच्या ४२ व्या कलमानुसार शेड्यूल्ड बँकेनें ठेवलेली रकम ही वरील २५% मध्यें मोजण्यास हरकत नाहीं. ह्याप्रमाणें बँका आपले पैसे ठेवतात किंवा नाहीं, ह्यावर रिझर्व्ह बँकेची दैनंदिन देखरेख रहावी, ह्याकरितां प्रत्येक बँकेनें रोजच्या माहितीचा ठराविक तक्ता दर आठवड्यास रिझर्व्ह बँकेकडे पाठविला पाहिजे. ब्रिटिश हिंदुस्थानांतील आपल्या ३१ डिसेंबर रोजींच्या देण्याच्या किमान ७५% इतकी तरी रकम बँकांनीं ब्रिटिश हिंदुस्थानांतच गुंतविलेली असली पाहिजे.

प्रत्येक बँकेनें दरमहा ठराविक नमुन्याप्रमाणें व ठराविक वेळेस आपली ब्रिटिश हिंदुस्थानांतील येणीं–देणीं दाखविणारा तक्ता रिझर्व्ह बँकेकडे धाडला पाहिजे. बँकेनें दिलेल्या कर्जाची व गुंतविलेल्या रकमांची वर्गवारी ( व्यापार, उद्योगधंदे आणि शेती ) रिझर्व्ह बँक दर सहामाहीस मागूं शकेल व ती तिला योग्य वाटेल त्या स्वरूपांत एकत्रित स्वरूपांत प्रसिद्ध करूं शकेल.

बँकांतील कित्येक ठेवींच्या खात्यांत वर्षानुवर्षे व्यवहार होत नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थानांतील अशा ज्या खात्यांत १० वर्षे व्यवहार झालेला नाहीं, त्यांचा तपशील दरवर्षी बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे पाठविला पाहिजे व प्रत्येक खात्यांतील बाकी त्यांत नमूद केली पाहिजे.

हिशेबाचें वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांचे आंत बँकांचे ताळेबंद व नफातोटा पत्रक रिझर्व्ह बँकेकडे रवाना झालीं पाहिजेत. ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर स्थापन झालेल्या बँकांनीं आपल्या ऑडिट झालेल्या हिशेबांचे तक्ते प्रामुख्यानें दिसतील अशा रीतीनें ब्रिटिश हिंदुस्थानांतील आपल्या शाखांतून टांगून ठेवले पाहिजेत.

## तपासणी, रिपोर्ट व उपाययोजना

मध्यवर्ती सरकार रिझर्व्ह बँकेस कोणत्याहि बँकेची तपासणी करण्यास, तिचे हिशेब तपासण्यास व सरकारकडे रिपोर्ट करण्यास, खालील प्रसंगीं सांगूं शकेलः—सरकारच्या मतें ( १ ) बँकेच्या ठेवीदारांच्या हितसंबंधांस धोका आहे, ( २ ) बँकेला आपलीं देणीं देतां येत नाहींत, ( ३ ) प्रस्तुत कायदा पाळण्यांत बँकेनें कसूर केलेली आहे, (४) बँकेनें किंवा बँकेच्या अधिकाऱ्यानें कायदा मोडून गुन्हा केला आहे किंवा गुन्हा होण्याचा संभव आहे, ( ५ ) इतर कांहीं कारणांसाठी तपासणी करणें इष्ट किंवा आवश्यक आहे.

ठेवीदारांच्या हितास विघातक अशा रीतीनें बँकेचा व्यवहार चालू आहे अशी वरील रिपोर्टावरून सरकारची खात्री झाल्यास, सरकार बँकेला नव्या ठेवी स्वीकारण्याची बंदी करूं शकेल, शेड्यूल्ड बँकेचें नांव शेड्यूलमधून काढून टाकूं शकेल, बँक किंवा गुंडाळण्यांत यावी, असा अर्ज करण्यास रिझर्व्ह बँकेस सूचना देऊं शकेल. ह्याप्रमाणें काढलेला हुकूम हिंदुस्थान सरकारास केव्हांहि रद्द करतां येईल किंवा बदलतां येईल. बँकेस योग्य मुदतीची सूचना देऊन, रिझर्व्ह बँकेनें सादर केलेला रिपोर्ट प्रसिद्ध करण्याचा हिंदुस्थान सरकारास अधिकार आहे.

## लिक्विडेशनच्या कामांत दिरंगाई नाहीं

सहाव्या कलमापासून वरील अठ्ठाविसाव्या कलमांपैकीं कोणत्याहि कलमाचा भंग झाल्यास, तो भंग होण्यांत बुद्धिपुरस्सर हात असलेला बँकेचा प्रत्येक डायरेक्टर व अधिकारी ह्यांस जितके दिवस भंग चालू आहे, त्या प्रत्येक दिवसागणिक ५०० रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा कायद्यानें सांगितली आहे. निर्दिष्ट ठराविक प्रमाणांत रोख रकम राखणें वगैरे संबंधांतील कलमांची अंमलबजावणी करण्यांत एखाद्या बँकेनें कसूर केली, तर तीस दिवसांत कलमांचे चौकटींत येण्याविषयीं रिझर्व्ह बँक तिला नोटीस देईल व ह्या मुदतींतहि बँक त्याप्रमाणें वागूं शकली नाहीं तर रिझर्व्ह बँक ती बँक गुंडाळण्यांत यावी असा कोर्टाकडे अर्ज करील. एखाद्या बँकेस तात्पुरत्या काळापुरतीं आपलीं देणीं देणें अशक्य होत असल्यास व तिनें कोर्टाकडे तसा अर्ज केल्यास, त्या बँकेविरुद्ध दावे व कारवाया कांहीं ठराविक काळ कोर्टास इष्ट वाटेल त्या अटींवर बंद रहाव्यात, असा हुकूम कोर्ट देऊं शकेल. ही मुदत एकूण तीन महिन्यांपेक्षां ज्यास्त मिळणार नाहीं. "बँकेचा अर्ज मंजूर केल्यास ती आपलीं देणीं भागवूं शकेल," असा रिझर्व्ह बँकेचा रिपोर्ट अर्ज करणाऱ्या बँकेनें दाखल केला पाहिजे. परंतु विशेष कारणांसाठी ह्या रिपोर्टाची अट दूर करण्याचा कोर्टास अधिकार आहे. बँक कोर्टामार्फत लिक्विडेशनमध्यें जावयाची असल्यास रिझर्व्ह बँकेलाच ऑफिशिअल लिक्विडेटर म्हणून नेमण्यांत येईल. आपल्या घेणेकऱ्याचे पैसे रुपयांत सोळा आणे परत करतां येण्याजोगी बँकेची परिस्थिति आहे, असें रिझर्व्ह बँकेचें सर्टिफिकेट मिळालेल्या बँकेसच आपण होऊन व्यवहार गुंडाळतां येईल. कोर्टापुढें हें काम चालू असतांनाच, बँकेस आपलीं देणीं भागवितां आलीं नाहींत, तर रिझर्व्ह बँकेच्या अर्जावरून कोर्टामार्फत वाइंडिंग अपचा हुकूम कोर्ट देऊं शकेल.

## नियम करण्याचा अधिकार

प्रस्तुत कायद्यास धरून व कायद्यांतील तरतुदी अंमलांत आणण्यास आवश्यक असे नियम रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यानें करण्याचा हिंदुस्थान सरकारास अधिकार आहे. कायद्याप्रमाणें पाठवावयाच्या तक्त्यांतील तपशील व तक्ते पाठविण्याची पद्धत ह्यासंबंधांत हे नियम विशेष खुलासा करतील. हे सर्व नियम सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध झाल्यापासून सहा महिन्यांचे आंत अंमलांत येऊं शकणार नाहींत. रिझर्व्ह बँकेनें करावयाच्या व्यवहारांत, "१९४५ च्या बँकिंग कंपनीज ॲक्टाप्रमाणें बँकेचा व्यवहार करणें" अशी भर घालून, रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांतील १७ वें कलम दुरुस्त करण्यांत आलें आहे.

---

## फ्रान्समधील चलनव्यवस्था—सोनें विक्री बंद

फ्रान्स बंधमुक्त झाल्याबरोबर तेथें अंमलांत आणावयाच्या चलनव्यवस्थेची तपशीलवार योजना अगदी तयार ठेवण्यांत आली होती, परंतु अद्याप ती अंमलांत आणण्यांत आलेली नाहीं. फ्रान्समधील दळणवळणाचीं साधनें नाश पावलीं अथवा नादुरुस्त झालीं असल्याकारणानें, पॅरिससारख्या मध्यवर्ती केंद्रांतून सबंध फ्रान्सचा राज्यकारभार चालविणें अशक्य झालें. प्रत्येक जिल्ह्याची व्यवस्था स्थानिक अधिकारीच पहात आहेत. नवीन नोटा प्रसृत करावयाच्या मार्गांतील ही अडचण अति महत्त्वाची आहे. नव्या चलन व्यवस्थेच्या अंमलबजावणीस जसजसा विलंब होईल, त्या मानानें तिला राजकीय विरोधहि वाढत्या प्रमाणांत होऊं लागेल. तूर्त तरी तेथें महागाई वाढत चालली आहे व चलनविस्तारास आळा अद्याप बसूं शकत नाहीं. सोन्याची खरेदीविक्री मात्र बंद करण्यांत आली आहे.

# स्फुट विचार

### वैमानिक वहातुक परिषदेची इतिश्री

शिकॅगो ( अमेरिका ) येथें युद्धोत्तर वैमानिक वहातुकीचा विचार करण्यासाठीं एक आंतरराष्ट्रीय परिषद नुकतीच भरली होती, तींमध्यें महत्त्वाच्या मुद्यांवर इंग्लंड व अमेरिका ह्यांत मत-भेद असलेले आढळून आले आणि परिषद निष्फळ ठरली ! अमेरिकेचें आर्थिक व औद्योगिक बळ इतर सर्व राष्ट्रांपेक्षां अनेक पटींनीं मोठें असल्याकारणानें, वैमानिक वहातुकीचे संबंधांत खुल्या स्पर्धेस वाव ठेवला, तर इंग्लंडसारख्या राष्ट्रांना त्या वहातुकींत स्थान राहणार नाहीं, अशी इंग्लंडला भीति वाटत आहे. म्हणून, ह्या वहातुकीवर कांहीं बंधनें घालून प्रत्येक राष्ट्रास योग्य वाव मिळावा, अशी इंग्लंडची मागणी होती. अर्थात, "प्रत्येक राष्ट्राच्या" वतीनें इंग्लंडची कारवाई चालू असली, तरी ब्रिटिश हितसंबंधाचा विचार त्याचे बुद्धाशी प्रामुख्यानें होता हें उघड आहे. इंग्लंडनें थोड्याशा सवलती देऊं करून, एका २१ सभासदांच्या आंतरराष्ट्रीय कौन्सिलकडे सर्व मुद्यांचा अखेर निर्णय सोपविण्यास तयारी दर्शविली, परंतु खुल्या स्पर्धेची आपली भूमिका सोडण्यास अमेरिका तयार झाली नाहीं. आंतर-राष्ट्रीय आर्थिक व व्यापारी घडामोडींत आजचें अमेरिकेचें अग्रेसरत्व व इंग्लंडप्रभृति राष्ट्रांचें दुय्यम स्थान, ह्यांचें प्रस्तुत परिषदेचा निष्फळपणा हें निदर्शक समजावयाचें काय ? आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या संघांमध्यें इंग्लंडचें त्याच्या साम्राज्यांतील देशांच्या सहकार्यानें नेहमीच बहुमत होणार असलें, तर अशा संघांत अमेरिकेसारखीं स्वावलंबी व महाबलवान राष्ट्रें सामील होऊन आपलें भवितव्य दुसऱ्याचे हातीं कां देतील ?

---

### हिंदी आरमार आणि जहाजांचा धंदा

किनाऱ्याच्या लांबीच्या दृष्टीनें जगांतील देशांमध्यें हिंदुस्थानचा नंबर बराच वर लागतो. किनाऱ्याची लांबी आणि देशाचें संरक्षण व व्यापार ह्यांचा निकट संबंध आहे. शत्रूपासून देशाचें संरक्षण करण्यासाठी समुद्रवेष्टित देशांस आरमार सिद्ध ठेवावें लागतें आणि व्यापारी जहाजांच्या वहातुकीची व्यवस्था करणें आवश्यक होतें. जय्यत आरमार राखून व्यापारी जहाजांच्या धंदास उत्तेजन देण्याचें धोरण राष्ट्रीय सरकारें अंगिकारतात तें ह्याकरितांच होय. हिंदुस्थानांत मात्र राष्ट्रीय आरमार आणि व्यापारी जहाजांचा धंदा ह्यांचेकडे परवापरवापर्यंत दुर्लक्षच झालें आहे आणि सरकारचें उत्तेजन ह्या संबंधांत मिळवण्याच्या लोकांच्या प्रयत्नास म्हणण्यासारखें यश आलें नव्हतें. तथापि, ह्या प्रश्नाचें महत्त्व युद्धविषयक गरजांनीं सरकारच्या निदर्शनास आणलें आणि गेल्या आठवड्यांत सर अझीजउल हक आणि व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल ह्यांनीं केलेल्या एतद्विषयक भाषणांवरून युद्धोत्तरकाळांत हिंदुस्थानांत जहाजांचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालू होण्याचें महत्त्व सरकारास पटलें आहे असें दिसून येतें. किनाऱ्यालगतची वहातुक आणि खुल्या समुद्रावरील वहातुकीचा योग्य हिस्सा हिंदी मालकीच्या आणि हिंदी व्यवस्थेखालील जहाजांस मिळाला पाहिजे अशी लोकमताची मागणी आज कित्येक वर्षांची जुनी आहे. जहाजांच्या तुटवड्याचा कटु अनुभव प्रस्तुत युद्धकाळांत आल्यामुळें सरकारच्या धोरणांत इष्ट असा बदल होत आहे. त्याचा परिणाम विधायक कृतींत होणें मात्र अत्यंत महत्त्वाचें आहे.

---

### धान्य गोळा करण्याची सरकारी व्यवस्था

मुंबई प्रांताप्रमाणें हिंदुस्थानांत कित्येक भागांत धान्याची वाटणी ठराविक किंमतीनें जनतेंत व्हावी म्हणून सरकारांनीं सक्तीच्या खरेदीची व्यवस्था केली आहे, तिची पहाणी करून हिंदुस्थान सरकारच्या अन्न खात्याचे खास अधिकारी मि. बटलर ह्यांनीं स्वतःचा तिच्या संबंधांत अभिप्राय सादर केला आहे. शेतकरी वर्गाकडून ठराविक प्रमाणांत आणि निश्चित किंमतीनें सक्तीनें धान्य खरेदी करण्याची योजना अंमलांत आहे ती पुष्कळांशी यशस्वी झाली असून कित्येक ठिकाणीं तिच्या बाबतींत घडलेल्या चुका अपवादात्मक गणल्या पाहिजेत असें त्यांचें म्हणणें आहे. तुटवड्याच्या भागांस धान्य पुरवतां येऊन त्याच्या किंमती स्थिर राखण्यांत यश येणें हा सक्तीच्या सरकारी खरेदीच्या व्यवस्थेची यशस्विता सिद्ध करण्यास पुरेसा समाधानकारक पुरावा आहे असा मि. बटलर ह्यांचा सिद्धांत आहे. मामुली परिस्थितींत हिंदुस्थानची धान्य निर्गत महत्वाची नाहीं आणि धान्याची थोडी आयात होते तेव्हां ती अंतर्गत किंमतीपेक्षां स्वस्त भावानें होते. ह्या दृष्टीनें पहतां, हिंदी शेतकऱ्यांस आपल्या मालास चांगला भाव मिळावा आणि त्यांची रहाणी सुधारण्यास मदत व्हावी ह्या हेतूनें सरकारी नियंत्रणाची व्यवस्था सध्याच्या पद्धतीस धरून युद्धपरिस्थितीची गरज भागल्यानंतरहि चालू रहावी अशी त्यांची सूचना आहे. त्यांनीं असेंहि सुचवलें आहे कीं धान्य जमविण्याची सक्तीची योजना सरकारनें अंगिकारली असतां खेडेगावीं लोकांसहि धान्य पुरवण्याची जबाबदारी त्यावर येऊन पडते आणि ती त्यानें स्वीकारली पाहिजे. मि. बटलर ह्यांच्या शिफारसी येणेंप्रमाणें आहेतः—शेतकऱ्यांच्या जरुरी इतकें धान्य त्यांच्यापाशी राहूं देऊन बाकीचें सरकारनें घ्यावें. ब्रिटिश प्रांत आणि संस्थानें ह्यांचेमध्यें धान्य योजनेचा मेळ घालण्यांत यावा. घाऊक व्यापाऱ्यांनीं केवळ सरकारच्या वतीनें धान्य साठवणीचा व विक्रीचा व्यवहार करावा. धान्याच्या व्यवस्थेची देखरेख नीट व्हावी ह्याकरितां खास अधिकाऱ्यांची योजना केली जावी. धान्य व्यवहारांतील लाचलुचपतीचें उच्चाटन करण्याचा प्रयत्न व्हावा. धान्य व्यवस्थेच्या देखरेखीची कार्यक्षम व्यवस्था आज अंमलांत नसल्यानें माल नासतो, नाहींसा होतो, इत्यादि अडचणी उद्भवल्या आहेत, त्यांचा उल्लेख मि. बटलर ह्यांनीं केला आहे आणि त्या संबंधांत योग्य तजवीज केली जाण्याचें महत्त्व प्रतिपादलें आहे. ह्यासंबंधांत आणि धान्यांचे भाव निश्चित करण्यांत मध्यवर्ती सरकारनें पुढें पाऊल टाकावें असें त्यांचें म्हणणें आहे.

---

### गुळाची नियंत्रित किंमत किती असावी ?

मुठा कॅनॉल्स इरिगेटर्स असोसिएशननें गव्हर्नरांचे सल्लागार, सर हेनरी नाइट, ह्यांस एक पत्र पाठवून गुळाच्या नियंत्रणासंबंधीं आपलें मत कळविलें आहे. वास्तविक, गुळाच्या किंमतीवर नियंत्रण बसविण्यांत येऊं नये, परंतु किंमत नियंत्रित करण्याचें सरकारनें ठरविलेंच तर ती किंमत १८ ते २० रुपये मण किंवा ५४ ते ६० रुपये पल्ला इतकी तरी किमान असावी, असें असो-

सिएशनचें म्हणणें आहे. १४ रुपये मण किंवा ४२ रुपये पल्ला असा दर ठरविण्यांत येणार आहे, अशी माहिती बाहेर आली आहे, परंतु ही किंमत ऊस करणारांस मारक ठरणारी आहे, कारण नियोजित नियंत्रित दरानें दर एकरी उत्पन्न १,३०० रुपये येईल व खर्च मात्र १८०० ते २,००० रुपये होईल, असा असोसिएशनचा युक्तिवाद आहे. मुळा कालव्याखालील जमिनी निकृष्ट असल्याकारणानें, त्यांत दर एकरी फक्त ३० पल्ले गूळ सरासरीनें होतो, असें असोसिएशननें आपल्या पत्रांत नमूद केलें आहे. उसाच्या व गुळाच्या उत्पादनाची किंमत वाढली आहे, ह्यांत संशय नाहीं, तथापि गूळ करून त्याच्या पैशांतून व्यवहार व निर्वाह करणाऱ्या शेतकऱ्याप्रमाणें इतर उपभोक्त्या खेडेगांवी जनतेचाहि विचार सरकारास करणें भाग आहे. उत्पादन खर्चाचा व दर एकरी उत्पादनाचा आकडा शक्य तितका अचूक ठरवून त्यावर नियंत्रित किंमत आधारावी लागेल, हें उघड आहे. ऊस व गूळ करणें नुकसानकारक होऊं नये, ही असोसिएशनची मागणी अर्थातच रास्त आहे.

## दि रत्नाकर बँक लि., कोल्हापूर

### ३० जून अखेरचा आढावा

ता. ६ ऑगस्ट, १९४३ रोजीं वरील बँकेनें कोल्हापूर व सांगली ह्या दोन ठिकाणीं धंदास प्रारंभ केला. ४ जानेवारी, १९४४ रोजीं बँकेची स्टॅच्युटरी सभा भरली व २७ ऑक्टोबर रोजीं ३० जून, १९४४ अखेरचा अहवाल साधारण सभेस सादर करण्यांत आला. बँकेचे ऑर्डिनरी व डिफर्ड मिळून ६,०८,५०० रुपयांचे भाग खपले असून वसूल भांडवल ३,०४,१५५ रुपये आहे. ठेवींचा आकडा ६½ लक्ष रुपयांवर आहे. बँकेनें सुमारें २ लक्ष रुपये रोख व बँकांत ठेवले असून ७ लाखांवर रकम कर्जाऊ दिलेली आहे. प्राथमिक खर्च ५,२५४ रुपये झालेला आहे. पहिल्याच अकरा महिन्यांत तिला १०,८२३ रुपये निवळ नफा झाला आहे. बँकेचें हिशेबाचें वर्ष डिसेंबर अखेर आहे, त्यावेळीं पहिला वार्षिक आढावा प्रसिद्ध होईल. बँकेची स्थापना मजबूत भाग भांडवलावर झाली असून पैसे किफायतशीर गुंतवण्यास पहिल्यापासूनच प्रारंभ झाला आहे. श्री. बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी., सांगली हे बँकेचे चेअरमन असून श्री. टी. एन. गरगटे, बी. ए., एलएल. बी., हे मॅनेजर आहेत.

### उत्तर किती चुकलें !

आपल्या जवळ एक सहस्रांश इंच इतका पातळ मोठा थोरला एक कागद आहे, असें समजा. कागदाचे दोन सारखे तुकडे करून एकावर एक ठेवा. ते पुनः मधें फाडून एकावर एक असे ठेवा. ते पुनः फाडून आठ तुकड्यांची रास करा. अशा रीतीनें ५० वेळा करा, रास किती उंच होईल ? कांहीं लोक २ इंच, तर कांहीं लोक १ फूट; कांहीं लोक १०० फूट असें उत्तर देतील. सुमारें १ कोटि, ७० लक्ष मैल, असें खरें उत्तर आहे ! पहिल्या-प्रथम कागद फाडला, तेव्हां २ तुकडे झाले; दुसऱ्यांदा फाडला तेव्हां ४ म्हणजे २ च्या वर्गाइतके झाले. ५० वेळा कागद फाडल्यावर २ चा ५० वा वर्ग इतके तुकडे होतील. २ चा ५० वा वर्ग म्हणजे ११,२६,००,००,००,०००,००० एवढा प्रचंड आंकडा होतो. एक इंच जाडींत १,००० तुकडे बसतात, ह्या हिशेबानें त्यांची रास १,१२,६०,००,००,००,०० इतकी इंच उंच होईल. त्याचे १७,००,००,०० मैल होतात !


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२३,००,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर जुनागड, कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रकम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध

# लायसॉफ

बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा

दोन वेळां उपयोग

दि मागोरा केमिकल कं. लि.

— हिराबाग, पुणें २ —


## 'अर्थ' ग्रन्थमाला.


१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## व्यापारी शिक्षणाचें राष्ट्रीय महत्त्व

### प्रो. काळे ह्यांचें भाषण

बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणें ह्या संस्थेच्या विद्यार्थ्यांचें स्नेहसंमेलन गेल्या शनिवारीं झालें. त्या प्रसंगीं प्रो. काळे ह्यांनीं आपल्या भाषणांत हिंदुस्थानास व्यापारी शिक्षणाचें महत्त्व किती आहे आणि त्याचें स्वरूप कसें असलें पाहिजे ह्याचें विवेचन केलें. डे. ए. सोसायटीनें व्यापारी कॉलेज काढून आपल्या शैक्षणिक कार्यास नवीन दिशा लावली आहे ह्या गोष्टीच्या औचित्याचा उल्लेख करून व्यापारी व्यवसायाचा व्याप आणि त्याची सामाजिक उपयुक्तता हीं विशद करून सांगितलीं. राष्ट्रीय संपत्तीचें उत्पादन, विभागणी व उपभोग ह्यांस सहाय देऊन जनतेच्या रहाणींत सुधारणा घडवून आणणें ही व्यापारी व्यवसायाची कामगिरी आहे; आणि तो मानाचा व उपकारक धंदा आहे. व्यापाराची उत्पादकता जुन्या अर्थशास्त्रज्ञांसहि मान्य नव्हती आणि सध्याहि व्यापारी म्हणजे दुसऱ्यास लुबाडणारा, परपुष्ट, आपमतलबी दलाल अशी कल्पना सामान्य जनतेंत पसरली आहे. ह्याचें कारण मुख्यत्वें करून व्यापाऱ्यांच्या काळ्या बाजारांतील कारवाया हें होय; आणि हा खरा लोकहितकारक व्यापार नव्हे. तथापि, युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानांत औद्योगिक उन्नति मोठ्या प्रमाणावर होण्यास समाजसेवादक्ष व कार्यक्षम धंदेवाल्यांची संख्या किती तरी पटींनीं वाढणें अगत्याचें आहे. सामान्य व्यक्तींच्या संपत्तीच्या वाटा द्विगुणित, त्रिगुणित होण्यास सहाय करणारे व्यापारी देशास हवे आहेत.'

प्रो. काळे पुढें म्हणाले कीं व्यापारी, व्यवसायाचें तपशीलवार तंत्र समजणें आणि त्याच्या घडामोडींचें व्यावहारिक ज्ञान होणें एवढीच व्यापारी शिक्षणाची व्याप्ती असतां कामा नये. ह्या तंत्राच्या मुळाशीं कोणतीं सूक्ष्म तत्त्वें आहेत आणि कोणत्या प्रेरक शक्तीनें व्यापारास उत्पादक गति व दिशा प्राप्त होते ह्याचें आकलन करण्याचें सामर्थ्य व्यापारी शिक्षणानें मिळालें पाहिजे. दूर दृष्टीनें व्यापारी धोरण आखणें आणि तें कृतींत उतरवणें ह्यास खोल अभ्यास व तीक्ष्ण बुद्धि ह्यांची आवश्यकता असते. व्यापारी शिक्षण पद्धतींत अशीं कर्तृत्ववान् माणसें तयार करण्याचा गुण असला पाहिजे. त्याचबरोबर गुणी व कार्यक्षम लोकांस स्वतःचें कौशल्य, आत्मविश्वास व धडाडी हीं प्रकट करण्यास योग्य संधी आणि वाव मिळणें अगत्याचें आहे. भांडवलवाल्या कारखानदारांस आणि धंदेवाल्यांस व्यापारी शिक्षण घेतलेल्या तरुणांचें महत्त्व वाटत नाहीं असा अनुभव इंग्लंडमध्येंहि येतो. हिंदुस्थानांतील ह्या संबंधांतली परिस्थिति प्रगतीस अत्यंत प्रतिकूल आहे. शिक्षित तरुणांस येथें संधी मिळत नाहीं. ह्यासाठीं हिंदुस्थानची आर्थिक उन्नति युद्धोत्तर काळांत व्हावयाची असेल तर प्रस्तुत दोन्ही बाबतींत सुधारणा होणें अत्यंत आवश्यक आहे. औद्योगिक प्रगतीसाठीं यांत्रिक व शास्त्रीय तज्ञ बाहेरून आणण्याची जरूर प्रथम थोडी फार भासेल. परंतु ह्या जागा हिंदी तज्ज्ञांनींच भरण्याची व्यवस्था झाल्यावांचून खरी प्रगति घडून येणार नाहीं.

व्यापारी शिक्षण घेतलेल्या तरुणांनीं निरनिराळ्या धंद्यांतलें आपलें काम चोखपणानें करून मिळणाऱ्या संधीचा पूर्ण फायदा घेण्याची आणि स्वतःची व देशाची आर्थिक सेवा करण्याची धमक अंगीं आणली पाहिजे. कोणीहि शिक्षित तरुण एकदम मोठा व्यापारी बनूं शकत नाहीं; पण क्रमाक्रमानें, अंगीं कुवत असल्यास, प्रत्येकास धंद्यांत वर चढतां येणें शक्य आहे. व्यापारी पेशा प्रामाणिकपणानें व चोख रीतीनें चालवल्यास तो इतर व्यवसाया इतकाच समाजहिताचा व बहुमानाचा आहे ह्याची प्रचीति शिकलेल्या तरुणांनीं आत्मविश्वासानें व स्वतःच्या कृतीनें समाजास आणून दिली पाहिजे. युद्धोत्तर काळ ह्या घटावास अनुकूल असाच आहे. इतर धंद्यांत गर्दी झाली तरी उद्योगव्यवसायांत होतकरू व शिकलेल्या तरुणांस वाव पुष्कळ मिळणार आहे. बृहन्महाराष्ट्र कॉलेजांतील प्राध्यापक वर्ग आणि शिक्षणपद्धति हीं कार्यक्षम आहेत. ह्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं देशाच्या औद्योगीकरणास सहाय देऊन स्वार्थ व परमार्थ साधावा असा उपदेश करून प्रो. काळे ह्यांनीं आपलें भाषण संपवलें.

---

### पुणें रेशनिंग हद्दींत वैयक्तिक रेशनिंग कार्डांस प्रारंभ कसा होईल ?

पुणें रेशनिंग हद्दींत वैयक्तिक रेशन कार्डांस लवकरच प्रारंभ होईल. हीं कार्डें सुरू झालीं, म्हणजे सध्याच्या कौटुंबिक रेशन कार्डाबरोबर वैयक्तिक रेशन कार्डेंहि लायसेनदार दुकानदाराकडे दाखल केल्याविना रेशन मिळणार नाहीं. विक्रीची नोंद मात्र कौटुंबिक रेशन कार्डावरच होईल. रेशनिंग इन्स्पेक्टर घरोघर जाऊन वैयक्तिक कार्डें वाटतील व त्या कार्डावर ज्याचें नांव असेल, त्याची सही घेतील. एका दुकानांत नोंदलेल्या कौटुंबिक रेशन कार्डांतील व्यक्तींचीं वैयक्तिक कार्डें वाटून झालीं, म्हणजे, दुसऱ्या दुकानांतील कार्डें, अशा रीतीनें सबंद रेशनिंग हद्द पुरी केली जाईल. कार्ड धारण करणारा एक महिन्यापेक्षा अधिक काळ पुणें सोडून जात असेल तर त्यानें आपलें कार्ड भाग कचेरींत दिलें पाहिजे. एक आठवड्यापेक्षा जास्त परंतु महिन्यापेक्षा कमी मुदतीची गैरहजेरी होणार असेल, तर त्याप्रमाणें भाग कचेरीस कळविलें पाहिजे व आपल्या कार्डावर दुसरा कोणी रेशन घेणार नाहीं अशी काळजी घेतली पाहिजे. भाग कचेरींत कार्ड ठेवल्यावर त्याची पावती दिली जाईल व पावती दाखल करतांच कार्ड परत मिळेल.

---

### उसाची लागवड

मुंबई प्रांतांत ब्रिटिश हद्दींत १,०४,००० एकरांमध्यें व संस्थानी हद्दींत ५८,००० एकरांमध्यें मिळून १,६२,००० एकरांत उसाची लागवड झालेली आहे. गेल्या वर्षीच्या लागवडीच्या आकड्यापेक्षा हा आकडा ०·२% नें ज्यास्त आहे व दशवार्षिक सरासरीपेक्षा तो ३४·२% नें ज्यास्त आहे.

### दररोज १०० उडते बाँब

४ सप्टेंबर अखेर ग्रेटब्रिटनवर एकूण ८,०७० जर्मन उडते बाँब आले, म्हणजे रोजची सरासरी सुमारें १०० पडली.

### ग्रेट ब्रिटनमध्यें तेलाच्या खाणी

ग्रेटब्रिटनमधील तेलाच्या खाणींत सप्टेंबर, १९३९ मध्यें २३८ टन तेल निघालें; आतां वार्षिक उत्पादन १ लक्ष टनांवर म्हणजे २ कोटि, ६० लक्ष गॅलनवर गेलें आहे. युद्धामुळें तेलाची व पेट्रोलची गरज वाढली व तेलाच्या खाणींकडे विशेष लक्ष पुरविलें गेलें. युद्धाच्या काळांत एकूण ७ कोटि, ८० लक्ष टनांचें उत्पादन झालें आहे.

## पेनिसिलिन हिंदुस्थानांत उपलब्ध

### पुण्याचे डॉ. घारपुरे हे शिफारस करणार

हिंदी नागरिकांच्या औषधोपचारासाठीं सुप्रसिद्ध पेनिसिलिन औषध आतां अमेरिकेच्या वॉर प्रॉडक्शन बोर्डानें उपलब्ध करून दिलें आहे. मध्यवर्ती सरकारनें नेमलेली एक समिति त्याची दरमहा प्रांतांत वाटणी करून देईल. मुंबई शहरांतील तीन दुकानदारांस पेनिसिलिन मिळालें आहे, त्यांचेकडूनच मुंबई प्रांतांतील डॉक्टरांस तें विकत घेतां येईल. मुंबई शहरांतील डॉ. परमार, डॉ. तिरोडकर व डॉ. शिरोडकर यांस आणि पुण्याचे सिव्हिल सर्जन डॉ. माळ, डॉ. मोदी व डॉ. के. सी. घारपुरे यांस असेसर्स नेमण्यांत आलें आहे. अहमदाबादेसहि तिघांची असेसर्स म्हणून नेमणूक झाली आहे. प्रत्येक असेसर दरमहा एकूण ४० लक्ष युनिट्स पेनिसिलिन डॉक्टर्स, खासगी बाळंतपणाचीं इस्पितळें, इत्यादींस मिळण्याबाबत सर्टिफिकिटें देऊं शकेल व त्यांच्या आधारें दुकानदारांकडून तें प्रत्यक्ष मिळवितां येईल. पेनिसिलिनचा ज्यावर उपचार चालू असेल, अशा रोग्याच्या केसचा ठराविक नमुन्याप्रमाणें केस रिपोर्ट सेंट्रल पेनिसिलिन कंट्रोल बोर्डाकडे पाठवावा लागेल.

### अमेरिका-बलवत्तम औद्योगिक राष्ट्र

जागतिक उत्पादन शक्तीच्या निम्म्याइतकी शक्ति आतां एकट्या अमेरिकेची झाली आहे. युद्धसमाप्तिनंतर सर्व जगांत अमेरिका हें औद्योगिक बाबतींत बलवत्तम राष्ट्र झालेलें आढळून येईल. जगाचें सर्वांत मोठें घेणेकरीहि तें बनेल.


महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्यांचे व्यापारी

गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें


## हिंदी गव्हाच्या पिकाचा सरकारी अंदाज

### लागवड व उत्पादन

| | १९४३-४४ | १९४२-४३ | + किंवा - |
|---|---|---|---|
| लागवड (एकर) | ३,३७,४०,००० | ३,४४,१७,००० | -२% |
| उत्पादन (टन) | ९६,९०,००० | १,१०,३२,००० | -१२% |
| दर एकरीं उत्पादन (पौंड) | ६४३ | ७१८ | |

### निर्गत व आयात

| | १९३९-४० | १९४०-४१ | १९४१-४२ |
|---|---|---|---|
| निर्गत (टन) | ७,८०० | ४५,००० | १,८५,००० |
| आयात (टन) | ८५,५०० | १८,८०० | १८,१०० |

१९३९-४० मध्यें आयात-निर्गत मिळून एकूण ७७,७०० टनांची आयात झाली होती; १९४०-४१ मध्यें आयातीपेक्षां निर्गत २६,२०० टन इतकी अधिक झाली व १९४१-४२ मध्यें तर आयात वगळून निव्वळ निर्गत १,६६,९०० टन इतकी झाली !

### सात वर्षांत ३ अब्ज, १९ कोटि रुपये खर्चण्याची योजना

युद्धोत्तर सात वर्षांच्या काळांत हिंदुस्थान सरकार ३ अब्ज, १९ कोटि रुपये खर्चून ५,००० मैल लांबीचे नवे आगगाडीचे रस्ते तयार करणार आहे व तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे हाल कमी करणार आहे, अशी पुनर्घटनेची योजना प्रसिद्ध झालेली आहे.

### सातांपैकी तीन ट्रॅक्टर्स आले

मद्रास सरकारनें खंड-उसनवार मार्गानें मागविलेल्या सात ट्रॅक्टर्सपैकी तीन ट्रॅक्टर्स त्यास मिळाले आहेत.


पूना गेस्ट हाऊस

संस्थापक :

कै. नानासाहेब सरपोतदार

टेलिफोन नं. ७७९

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-treaders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.